# प्रकरण पहिले

# आधुनिक मराठी कविता : विविध प्रवाह

## प्रस्तावना :

मराठी कवितेचा सूक्ष्मपणे विचार करता असे लक्षात येते की मराठी काव्याचा प्रारंभ मराठी भाषेच्या प्रारंभापासूनच झालेला आहे. ही मराठी कवितेची वाटचाल आजअखेर पर्यंत अखंडपणे चालू आहे. या प्रदीर्घ कालखंडात मराठी कविता बहरली, फुलली तसेच ती समृध्दही झाली. विविध अर्थ, रुप, छटा दाखवित ती लावण्यवती झाली. मराठी काव्याच्या प्रांतावर फार मोठ्या प्रमाणात पाश्चिमात्य कवी व कवितांचा प्रभाव पडल्याचे आपणाला दिसते. मराठी कवितेच्या प्रवासाची ही अनेक वळणे लक्षात घेतली की कालानुरुप तिचे जे स्वरुप बदलले त्याचा छोटासा आढावा घेणे अत्यावश्यक ठरते.

काव्याच्या बाबत विचार करता काव्य हा अनेकांच्या स्फुर्तीचा विषय झाला आहे हे निर्विवाद सत्य आहे. स्फुर्ती म्हणजे उर्मी. ज्या भावनांचा उत्स्फुर्तपणे उद्रेक होतो त्या भावना म्हणजे काव्य असे वर्डस्वर्थ म्हणतो अशा काव्याची निर्मिती, तिचे स्वरुप यामध्ये काय फरक आहे ते पाहणे गरजेचे आहे. तसेच प्राचीन व अर्वाचीन कवींनी काव्यतत्त्वाबद्दल जे विचार व्यक्त केले आहेत ते भावनोत्कट आहेत. म्हणून कवितेसंबंधी विचार करीत असताना तिचा आढावा ऐतिहासिक रुपाने लक्षात घेऊ.

## प्राचीन मराठी काव्य (संत-पंत-तंत) :

मराठीतील प्रारंभीची कविता मौखिक रुपात होती. सुमारे १० ते १२ व्या शतकात ग्रांथिक वाङ्मय निर्माण झाले. मराठी ग्रंथ निर्मितीचा प्रारंभच काव्य रुपाने झाला असल्याने मराठी कविता गद्यापेक्षा निश्चितच अधिक सन्माननीय ठरते. शक १११० मध्ये आद्यकवी मुकूंदराजानी 'विवेकसिंधु' हा आद्यग्रंथ लिहला. यादवकाळात महानुभव पंथाच्या कवी व कवयित्रींनी मराठी वाङ:मय समृद्ध केले. मराठी भाषेतील आद्यकवयित्री महदंबेने भावपूर्ण धवले गाऊन आपले शिघ्र कवित्वाचे वैशिष्ट्य दाखविले. भास्करभट्ट बोरीकर, नरेंद्र, दामोदर पंडित, खळोव्यास अशा अनेक महानुभवीय कवींनी काव्यनिर्मिती केली. त्यांची प्रेरणा व हेतू हा मुख्यत: ईश्वरभक्ती कृष्णस्तुती आणि पंथीय प्रसार होता.

त्यानंतर भागवत संप्रदायातील संत कवी व कवयित्रींच्या काव्यनिर्मिती मागील प्रेरणा व हेतुसुद्धा ईश्वरभक्ती, आत्मोद्धार आणि लोकोद्धार हाच होता. संतज्ञानेश्वरांच्या ठायी कवित्व,

संतत्व आणि रसिकत्व यांचा त्रिवेणी संगम झाला आहे. ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतील सर्वच संत स्त्री-पुरुषांनी काव्यत्मक-अभंगनिर्मिती केली. महानुभवीय प्रभावळीतील कवयित्रींनी तसेच वारकरी संप्रदायातील सर्वच संत कवी व कवयित्रींनी ओवी व अभंग या माध्यमातून काव्यरचना केली. संत नामदेव हे मराठीतील पहिले भावकवी व आत्मचरित्रकार मानले जातात. तसेच जनाबाई, मुक्ताबाई, वेणाबाई यांनीही भावपूर्ण अभंग रचले. चोखामेळा, सावतामाळी, गोराकुंभार, नरहरी सोनार, सेना न्हावी यांनी स्फुट अभंग रचना केली. ज्ञानेश्वरांच्या नंतर ३०० वर्षांनी एकनाथांनी मराठी कविता समृद्ध केली. तुकारामांचे कवी आणि कविता यांचे एकरुपत्व असलेले आदर्शवत ठरले. तसेच पंडीती काव्याच्या प्रवाहामध्ये अनेकांनी काव्यरचना केलेली आपणास दिसते. कलाकवी मुक्तेश्वर, वामन पंडीत, सामराज, नागेश, श्रीधर, मोरोपंत या कवींनी पंडीती कालखंड गाजविला. याला पंतकाव्य असेही संबोधतात.[१]

## संत कवयित्रींचे योगदान :

प्राचीन मराठी वाड:मयात संत कवयित्री म्हणून म्हदंबा, संत मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाई, कान्होपात्रा आणि वेणाबाई यांचा विशेषत्वाने उल्लेख करता येतो. या संत कवयित्रींनी आपल्या काव्यातून मोठ्या प्रमाणात 'स्व' ला प्रकट केले आहे. परमेश्वराचे दर्शन घडविता घडविता त्या स्वत:ला चित्रीत करतात. या कवयित्रींच्या मनाचा शोध घेताना विविध रुपामध्ये प्रकट झालेले त्यांचे मन अभ्यासणे अत्यावश्यक आहे.

मराठीतील आद्य कवयित्रीचा मान श्रीचक्रधरशिष्या महदंबा हिच्याकडे जातो. महदंबेने धवळ्यांची निर्मिती केली. धवळ्याचे स्वरुप हे प्रारंभिक कवितेसारखे आहे. भागवतातील श्रीकृष्ण-रुक्मिणी विवाहास एक वेगळे भावरुप देण्याचा प्रयत्न धवळयाच्या रुपातून महदंबेने केला आहे. तसेच या विवाहास विरोध करणाऱ्या रुक्मीणीच्या अंतरंगाचा शोध घेण्याचा महदंबेचा प्रयत्न प्रत्ययकारी आहे. रुक्मीणीचे भावचित्रही तिने अत्यंत कल्पकतेने आपल्या धवळ्यातून रेखाटले आहे.

थोडक्यात महदंबेचे धवळे म्हणजे एक कथाकाव्य असून निवेदन कौशल्य, प्रसंगचित्र, भावसौंदर्य आणि जिवंत भाषा असे अनेक विविध विशेष या काव्यात प्रत्ययास येतात.

अलौकिक प्रतिभेचे सामर्थ्य लाभलेली संत कवयित्री म्हणजे संत मुक्ताबाई. मुक्ताबाईंच्या कविता चिंतनीय, उपदेशपर अशा आहेत.

उदा : पहिली माझो ओवी । प्रात:काल होता

गाईला विधाता । त्रिकुटाचा

मुक्ताबाईच्या काव्यामध्ये गुढगुंजनता आढळते त्यामुळे मनात निर्माण होणाऱ्या प्रतिमांना मूर्त रुप देताना तिच्या काव्यात भावनाविष्काराचा आगळा अनुभव येतो. 'त्यादृष्टीने पाहता गुढगुंजनातून साक्षात्कार करणारी मुक्ताबाई मराठीतील पहिली स्त्री ठरते. असे रा. र. गोसावी म्हणतात.'[२]

मुक्ताबाईचे हरिपाठाचे अभंग, कूट अभंग, ताटीचे अभंग आहेत. ताटीच्या अभंगातून तर मुक्ताबाईच्या मनातील धगधगणारे वैराग्य दिसत असले तरी मनातील लडिवाळपणाही दिसतो. मुक्ताबाईचे मन त्यांच्या ओवी-अभंगातून मोठ्या प्रमाणात प्रकटते.

तसेच जनाबाईच्याही अभंगाचे आहे. जनाबाईच्या स्त्री मनातील विविध भावस्पंदने उत्कटतेने त्यांच्या अभंगातून अविष्कृत होतात. तिच्या रचनेत उत्कट भक्तीभावाबरोबरच स्त्रीसुलभ भाव-भावनांचा अविष्कार झाला आहे. आपले स्त्रीपन आणि दासीपण लक्षात घेवूनच आपल्या अध्यात्मिक अनुभूतींनी ती सामोरी जाते. त्यामुळे जनाबाईंच्या अभंगांचा मराठी अभंगविश्वात स्वत:चा एक वेगळा ठसा आहे.

जनाबाईची कविता ईश्वरविषयक प्रेमानुभूती व्यक्त करते. स्त्रीमनातील जिव्हाळ्याने, भावभावनांनी ओथंबलेले तिचे अभंग प्राचीन मराठी काव्यात वैशिष्ट्यपूर्ण असे आहेत.

त्याचप्रमाणे तुकारामशिष्या बहिणाबाईच्या अभंगाचेही एक वेगळेपण मराठी कवितेत पहावयास मिळते. बहिणाबाईंनी विविध स्वरुपी रचना केल्या आहेत.

ब्रम्हकर्मपर अभंग, आत्मनिवेदनपर, निर्वाणपर, मनपर, भक्तीपर, सद्गुरुची थोरवी, संतवर्णनपर अभंग, बोधपर, तुलसी महात्म्य, नाममहात्म्यपर, करुणापर अभंग, रुपके इत्यादींचा समावेश त्यांच्या अभंगात होतो.

अशाप्रकारे विविधांगी रचनेतून आपल्या भावानुभवाला व्यक्त करणारी बहिणाबाईची प्रतिभा प्राचीन मराठी काव्यात वेगळेपणा सिद्ध करते.

त्याचबरोबर रामदासशिष्या वेणाबाई, कान्होपात्रा या संत स्त्रीयांनीही ओवी व अभंगाच्याद्वारे आपल्या अनुभवांना प्रकट केले आहे. वात्सल्य, कोमलता, सहनशीलता, त्यागमयप्रवृत्ती आणि

भावसघनता हे स्त्रीहृदयाचे विशेष मोठ्या प्रमाणात जनाबाईच्या अभंगात प्रकटलेले आहेत. त्यापेक्षा काही अंशी प्रमाणात इतर कवयित्रींच्या काव्यातही येताना दिसतात.

१८ व्या शतकाच्या प्रारंभी मराठी काव्यात शाहीरी वाङ:मयाचा उगम झाला. लावणी व पोवाडा या दोन काव्यप्रकारांनी बहुजन समाजाचे मनोरंजन केले या काव्याला 'तंत काव्य' म्हणून ओळखले जाते. अनंतफंदी, परशुराम, सगनभाऊ, प्रभाकर, होनाजी बाळा या शाहीरांनी मराठी काव्य समृद्ध केले. हा शाहीरी वाङ्:मयाचा काळ पेशवाईमध्ये बहरला आणि पेशवाईच्या अस्ताबरोबर अस्तंगत झाला.

वरील संत-पंत-तंत वाङ्मयातील काव्याचा प्रभाव १८७६ पर्यंत जाणवत होता असे दिसते. १८७६ नंतर नवे विचार, नवे सामाजिक व राजकिय स्थित्यंतर या सर्वांचे प्रतिबिंब मराठी काव्यात आले. या वरील कालखंडाला भाषांतर युग असे म्हणतात. या कालखंडाला लोकहितवादी व महात्मा फुले यांच्यासारख्या प्रचंड विचारवंतानी मानवताधिष्ठित समता आणि समताधिष्ठीत सामाजिक जीवनमूल्य यांचा प्रथम उच्चार केला. आपल्या अखंड काव्यरचनेतून वैचारिक क्रांतीचे बीज पेरले. कवितेत सामाजिकता आणून तिला वैचारीक बैठक देण्याचा पहिला प्रयत्न जोतीरावांनी केला ही सामाजिकता नंतरच्या काळात केशवसुतांच्या कवितेत आढळते.

## आधुनिक मराठी कविता :

### १८८५ ते १९२० 'केशवसुत कालखंड'

१८८५ ते १९२० हा मराठी कवितेचा क्रांतीकाळच होय. १९८५ मध्ये केशवसुतांची कविता प्रथम रसिकांच्यासमोर आली आणि मराठी कवितेत क्रांतीकारी परिवर्तन झाले. केशवसुतांनी मराठी काव्य प्रवाहाला चिंतनपूर्वक नवी दिशा नवी वाट देण्याचे ऐतिहासिक कार्य केले. त्यांनी कवितेच्या अंर्तबाह्य स्वरुपात बदल केले. सुनित रचना मराठीत आणली. मुक्तछंदात रचना करुन गणमात्रांचे बंधन झुगारले. कवि आणि कविता यांच्याकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. कवितेला आत्मनिष्ठ बनविले आणि कविला प्रतिष्ठा मिळवून दिली. काव्यविषयात विविधता आणि वैचित्र्य आणले. सुनित रचना, गुढगुंजनाची प्रवृत्ती, सामाजिक आशय, प्राणयभावनांचे नवे रुप, निसर्गविषयक नवा दृष्टीकोन या गोष्टी केशवसुतांनी मराठीत आणून तिच्यात अमूलाग्र क्रांती केली. मराठी कवितेत सौंदर्यवाद केशवसुतांनी आणला. यांशिवाय मराठी कवितेमध्ये गुढता आणि दुर्बोधता यांचा प्रवेश केशवसुतांच्या कवितेपासून झाला ही गोष्ट लक्षणीय ठरते.

## १९२० ते १९४५ - 'रविकिरण मंडळाचा काळ' :

केशवसुतांच्या कवितेने केशवसुत संप्रदाय निर्माण केला. कवी बी, रेव्हरंड टिळक, बालकवी, विनायक, कवी गोविंदाग्रज इत्यादींचा समावेश त्यात होता. केशवसुतांच्या समकालीन कवींनीही पुष्कळ कविता लिहल्या. ज्या मराठी काव्यात उल्लेखनिय ठरतात. १९०५ नंतर मराठी काव्याच्या प्रांतात थोडासा अंधार पसरला गेला असे वाटते ना वाटते तोच १९२३ च्या रविकिरण मंडळाच्या उदयाने मराठी काव्यक्षेत्रात तेजस्वी कार्य केले. माधव ज्युलीयन, कवी गिरीश, कवी यशवंत, रानडे, माडखोलकर, गोखले आणि दिवाकर हे या रविकिरण मंडळाचे संस्थापक कवी होते. याच काळात ऐतिहासिक व राष्ट्रीय कवितेचा प्रवाह निर्माण झाला. कवी गोविंद, वि. दा. सावरकर, सानेगुरुजी इत्यादी कवी राष्ट्रीय व ऐतिहासिक कवी म्हणून ओळखले जातात. या काव्याच्या समकाळी विडंबनात्मक व विनोदी काव्य उदयास आले. प्र. के. अत्रे (झेंडुची फुले) बाळकराम, अनंत काणेकर इत्यादी विडंबनपर कविता करणारे कवी होते.

आत्मनिष्ठ किंवा राष्ट्रनिष्ठ या दोन्ही प्रेरणांना बाजूला ठेवून सामाजिक क्षेत्रातील संस्था व व्यक्ती यांच्याकडून घडणाऱ्या हास्यास्पद गोष्टीतून प्रेरणा मिळून विडंबन काव्याची निर्मिती झाल्याचे दिसते. अशा प्रकारच्या काव्यनिर्मितीत प्र. के. अत्रे यांनी विशेष पुढाकार घेतला.

परंतु एकंदररित्या मराठी काव्यक्षेत्रात विडंबन काव्याचा प्रवाह क्षणिच राहिलेला दिसतो.

याच कालखंडात भा. रा. तांबे, माधव जुलीयन, कवी यशवंत यांनी आपल्या कवितातून आध्यात्मिकता स्पष्ट केली. परंतु विष्णूदास, दासगणू, तुकडोजी यांनी या प्रवाहाला गती दिली. ''प्राचीन मराठी संतकवींची परंपरा, निष्ठापूर्वक आजतागायत जिवंत ठेवलेल्या क्षेत्रात त्यांचा वाटा फार मोठा आहे.''[३] असे अ. ना. देशपांडे यांचेही मत असलेले दिसते.

स्वतंत्र काव्यनिर्मितीबरोबरच भाषांतरित कविताही या काळात निर्माण झाली. इंग्रजी व संस्कृत काव्याची भाषांतरे या काळात झाली. कृ. ब. गोडबोले, रा. चिं. श्रीखंडे, कुसुमाग्रज यांची नांवे या दृष्टीने उल्लेखनिय ठरतात. संस्कृत भाषेकडे कवींनी भाषांतराच्या दृष्टीने पहावे यामागे दोन कारणे संभवतात. कालीदासासारख्या कवीला जी रसिकमान्यता लाभली ती पाहून 'रघुवंश', 'मेघदूत' सारख्या काव्यांचे अनुवाद करण्याकडे कवींचा कल राहिला. तसेच मराठी स्वतंत्र वाङमय निर्मितीला उपकार ठरले म्हणून परप्रांतीय भाषेमधील साहित्याची भाषांतरे करण्याकडेही कल असणे स्वभावविक होते.[४]

एकंदरीत या काळात भाषांतरीत कवितेच प्रवाह या कवींनी अविरत वाहत ठेवला.

१९३५ नंतर मराठी कवितेला पुन्हा एकदा आहोटी लागली असे वाटत असतानाच मराठी कवितेने नवे प्रतिभासंपन्न आणि समाजभिमुख वळण घेतले. हे रुप देणाऱ्या कवीमध्ये अनिल, कुसमाग्रज, कृ. ब. निकुम्ब, वि. म. कुलकर्णी, ना. ग. जोशी इत्यादी कवींचा समावेश होतो. कुसमाग्रजांच्या कवितेने तर ज्ञानपीठ पारितोषकाचा (विशाखा) सर्वश्रेष्ठ पुरस्कार मिळवला. नंतरच्या काळात मराठी काव्य क्षेत्रात बा. सी. मर्ढेकर, पु. शि. रेगे, शरदचंद्र मुक्तीबोध या तीन कवींनी आपली अजरामर छाप पाडली.

## १९४५ ते १९६० - 'नवकाव्याचा कालखंड' :

१९४५ ला दुसरे महायुद्ध झाले. राष्ट्रीय व जागतिक पातळीवर राजकीय, सामाजिक, शैक्षणिक घडामोडी वेगाने घडल्या. यंत्रयुगाचा जन्म, शहरीकरण, औद्योगिक क्रांती आणि महायुद्ध या सर्वांचा परिणाम मानवी जीवनावर झाला. याच सुमारास सिग्मंड फ्राईड याने मानसशास्त्राची ओळख जगाला करुन दिली. सर्व घटनांचा परिणाम सर्वच संवेदनशील मनावर झाला. साहजीकच मराठी कवितेत याचे प्रतिबिंब उमटले. या दुसऱ्या काव्यक्रांतीचे श्रेय बा. सी. मर्ढेकर यांच्याकडे जाते. किंबहुना यांना दुसरे केशवसुत म्हटले जाते. ऱ्हासशिल व रोमॅंटिक कवितेचे संकेत मोडून मर्ढेकरांनी मराठी कविता खऱ्या अर्थाने आधुनिक केली. १९३८ (शिशिरागम) या त्यांच्या पहिल्याच काव्यसंग्रहातील कविता बव्हशी सौंदर्यवादी आहेत. मात्र बदलत्या परिस्थितीची जाणीव त्यांना तात्काळ झाली नि झपाट्याने बदललेल्या समाजाचे चित्रण त्यांच्या ''आणखी कविता'' आणि ''आणखी काही कविता'' या दोन संग्रहातून चित्रीत झाले. मर्ढेकरांनी आपल्या कवितेत बदललेले अनुभवविश्व, उद्‌विग्नता, निराशा यांचे चित्रण साकारलेले आहे. मर्ढेकरांच्या कवितेतील या स्थित्यंतराला मराठी कवितेच्या इतिहासात महत्वाचे स्थान आहे. यंत्रयुगाच्या प्रभावाखाली झपाट्याने बदलत चाललेल्या सामाजिक परिस्थितीमुळे दुभंगलेली मानसिकता आणि तिची भयावहता मर्ढेकरांच्या कवितेत प्रकर्षाने जाणवते. वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक विघटनाच्या प्रक्रियेचे चित्रण प्रथम मर्ढेकरांनी आपल्या कवितेतून केले. दुसरे महायुद्ध, भीषण मानवसंहार, अणूबॉंबची दाहकता, फ्राईड व युंग यांचे मनोवैज्ञानिक शोध, नैतिक मुल्यांचा झालेला लोप आणि या सर्वामुळे होणारी मानवी मनाची भावनिक ससेहोलपट आणि वैचारिक पेच प्रसंग प्रथमच त्यांच्याच कवितेतून अविष्कृत झाले. १९४७ नंतर उदयाला आलेल्या शरदचंद्र

मुक्तिबोधांची प्रतिभासंपन्न अशा सामाजिक आशयाची कविता निर्माण झाली. 'नवी मळवाट' आणि 'यांत्रीक' या संग्रहातून मुक्तिबोधांनी मराठी रोमँटिक कवितेच्या परंपरेला शह देऊन सामाजिक बांधिलकीची कविता लिहिली आणि आपल्या कवितेची वेगळी वाट व आधुनिकता प्रस्थापित केली.

मर्ढेकरांच्या कवितेत प्रकट झालेल्या काही साम्यवादी प्रवृत्तींना त्यांनी आपल्या कवितेत मार्क्सच्या क्रांती विचारांची निश्चित अशी वेगळी बैठक दिली. हे मुक्तीबोधांचे खास काव्यकर्तृत्व मानावे लागेल. म्हणूनच त्यांची कविता मराठीतील पहिली राजकीय कविता ठरते.

मुक्तीबोधांच्या या सामाजिक बांधीलकीच्या मार्क्सवादी कवितेची परंपरा विं. दा. करंदीकर, नारायण सुर्वे यांनी समर्थपणे चालू ठेवली. पण या तीघांनीही मराठी कवितेत मध्यमवर्गीय समाज घटकांच्या वेदना, जाणीवा, दु:खे व्यक्त करता आली नाहीत.

'नवकाव्य' परंपरेत अनेक कवींनी काव्य निर्मिती केली. या परंपरेतील कवींनी रविकिरणमंडळोत्तर कवितेच्या आशयापेक्षा वेगळी प्रत्ययपूर्ण अशी कविता लिहली.

अनिलांची भावव्याकुळता, कुसुमाग्रजांची नाट्याभिमुख क्रांतीनिष्ठा, बोरकरांचे धुंद निसर्गवेढ, ना. घ. देशपांडेचा रानावनातला धीट शृंगार, पु. शि. रेग्यांचे अल्पाक्षरयुक्त प्रेमलेखन, इंदिरा संतांची सौंदर्यरुप झालेली वेदना इत्यादी वैशिष्ट्यांनी नटलेली कविता या दरम्यान कवीं समोर होती. ही कविता या काळात मर्ढेकर किंवा मुक्तीबोधांची कविता यांच्या कवितेपेक्षा कितीतरी अधिक लोकप्रिय होती.

सामान्यत: या कालखंडात परंपरागत पद्धतीने भावलेखन करणाऱ्या कवींपैकी एखादा दुसरा अपवाद वगळता बहुसंख्य कविता मध्यमवर्गीय मराठी मनाचे निर्देशन करणारी आहे. प्रेमानुभूती, निसर्गानुभूती, जीवनानुभूती ह्यांच्या बळावर कवींनी अजरामर काव्यनिर्मीती केली.

निसर्ग आणि मानव यांच्यातील भावनिक अतूट संबंधाची जाणीव प्रत्येक कवीच्या मनात असल्याने आपले मनोभाव प्रकट करताना सतत निसर्गाचा आधार त्यांना घ्यावा लागला. विशेषत्वाने मंगेश पाडगांवकर, बा. भ. बोरकर, ना. घ. देशपांडे, इंदिरा संत यांनी मराठी अभिजात काव्यपरंपरा निर्माण केली.

नवकाव्याच्या या परंपरेत ज्याला भावकाव्य म्हटले जाते या परंपरेत काही चिंतनशील कवींनीही आपले वेगळेपण जपण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात आरतीप्रभू आणि कवी ग्रेस यांनी अधिक लक्षणीय कार्य केले. ठराविक आशयसुत्रे आणि सांकेतिक प्रेमसामग्री यांचा त्याग करुन आपल्या समग्र संवेदनविश्वाचा तळ शोधणारी प्रेमकविता त्यांनी लिहली. म. म. देशपांडे, मधुकर

केचे, गजमल माळी, आनंद यादव, ना. धों. महानोर, विठ्ठल वाघ, बहिणाबाई चौधरी यांनी या कालखंडात अतिशय सुरेख अशी काव्य निर्मिती केली.

**साठोत्तरी कवयित्रींचा भावविलास :**

साठोत्तरी कालखंडातील कवयित्रींनी आपल्या काव्यातून स्त्रीजीवनाच्या विविध भावछटा रंगविल्या आहेत. त्यानुसार साठोत्तरी मराठी कवितेचा प्रसार करीत असताना या कालखंडातील काही कवयित्रींच्या काव्यप्रवाहाचा प्रथम आढावा घेणे अपरिहार्य ठरते. साठोत्तरी काळात स्त्रीशिक्षणामुळे स्त्रीयांमध्ये जाणीव जागृती झाली. समाजातील अनेक स्तरामधून कवयित्रींनी पुढे येवून आपल्या मनातील भावना धीटपणे व कलात्मकपणे व्यक्त करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला. काही कवयित्री अंतर्मुख होवून लिहायला लागल्या.

तत्पूर्वी इंदिरा संत (शेला, मेंदी, मृगजळ) यांच्या काव्यातील भावनांचा आविष्कार आणि निसर्ग सौंदर्याची ओढ यातून काव्याला बहर आला. पद्मा गोळेंनी (प्रीतीपथावर, निहार, आकाशवेढी) आत्मनिष्ठ अनुभवातून काव्यलेखन केले तर संजीवनी मराठे यांनी आपल्या काव्यात जीवनातील सौंदर्य टिपलेले दिसते. मात्र शांता शेळके (वर्षा, रुपसी, गोंदण) यांच्या कवितेने मराठी रसिकांना अंतर्मुख बनविले.

वरील कवयित्रींच्या काव्यातील भावनांचा आवेग १९८० च्या दशकात ओसरला होता. हेमा लेले, अनुराधा गुरव, नीरजा, प्रज्ञा लोखंडे, पद्मीणी बिनिवाले, शैला सायनाकर, मल्लीका अमरशेख, प्रभा गणोरकर, अनुराधा पाटील या कवयित्री आपल्या मनातील भावना मुक्तपणे काव्यातून मांडू लागल्या. आजच्या मराठीतील कवयित्रींविषयी नेमाडे म्हणतात की ''आजच्या सर्व कवयित्रींना तू शिवाय किंवा प्रियकराच्या भावनिक अस्तित्वाशिवाय कविता पूर्ण करता येत नाही. याचे कारण वातावरणाचे सुखलोलूप्य आणि रिक्तपणाची जाणीव हे आहे. तरीही या कवयित्रींना आपल्या अस्तित्वाची जाणीव होवू लागली होती, आपली होणारी घुसमट, केलेली कोंडी या कवयित्री बोलून दाखवू लागल्या.[५]

एकूण मराठी कवितेमध्ये साठेत्तरी कवयित्रींचे स्थान अस्पष्ट असले तरी साठपूर्ण कवयित्रींच्या कवितांचा विचार करता या काळातील कवयित्रींच्या कविता विकासाच्या दिशेने चाटचाल करीत आहे. असे म्हणता येते. कारण मराठी कविता समृद्ध करण्यामध्ये या कवयित्रींचा वाटा मोलाचा आहे.

स्त्रीकाव्याच्या प्रवाहाबरोबर वहात आलेला मराठी काव्यातील दुसरा विलक्षण असा प्रवाह म्हणजे महानगरीय ग्रामीण आणि दलित विद्रोही कवितांचा आहे.

**महानगरीय संवेदनाचा अविष्कार :**

साठोत्तरी मराठी कवितेतील बंडखोरीचा सूर प्रथम महानगरातच उमटलेला दिसतो. आधुनिक मराठी कवितेत खरे तर महानगरीय बंडखोरीचे निशाण प्रथम मर्ढेकरांनी उभारले हे सुस्पष्ट आहे. वास्तविक सर्व मराठी मुलखाच्या सांस्कृतिक अधिसत्तेची खुर्ची या महानगरांनी बळकावली असे म्हणता येईल. महानगरात जे जे घडले ते ते महाराष्ट्राचे प्रातिनिधिक असले पाहिजे.
साटोत्तरी काळातील सगळे अग्रेसर कवी त्यामध्ये नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, अरुण कोलटकर, दिलीप चित्रे, सतिश काळसेकर हे होते. या कवींनी आपल्या काव्यातून मोठ्या प्रमाणात महानगरीय संवेदनेचा अविष्कार घडविला.

'अरुण कोलटकर यांची कविता महानगरीय संवेदनेचा एक व्यापक, सखोल आणि प्रक्षोभक अविष्कार आहे.मर्ढेकरांच्या कवितेत प्रकट झालेल्या या महानगरीय संवेदनेच्या कक्षा त्यांनी वाढवल्या मात्र मर्ढेकरांच्या कवितेतील सामाजिक जाणीव आणि पारंपारिक अध्यात्म हे संलग्न संदर्भ बाजूला सारुन कोलटकरांची कविता महानगरीय संस्कृतीच्या भयावहतेचे थेट प्रक्षेपण करते.'

'अरुण कोलटकरांप्रमाणे दिलीप चित्रे यांची कविता या महानगरीय संवेदनेचा एक महत्वाचा अविष्कार आहे. महानगरीय जीवनातून निर्माण झालेली शून्यतेची आणि निरर्थकतेची जाणीव अप्रत्यक्षपणे सर्वत्र वावरताना दिसते. महानगरीय संस्कृतीचे संदर्भ थोडेसे अध्याहृत ठेवून त्यातील शुन्यता व निरर्थकता यांना शह देऊ शकतील असे संदर्भ शोधण्यात चित्र्यांच्या कवितेची महती आणि वेगळेपण आहे.'[६]

एकंदर कोलटकर, सुर्वे, चित्रे, अशोक शहाणे, ढसाळ, सतिश काळसेकर यांनी महानगरीय कवितेचा प्रवाह मराठीत अधिक बळकट करण्यात महत्वपूर्ण कामगिरी बजावली.

**ग्रामीण कविता :**

ग्रामीण जीवनानुभवाचे प्रकटीकरण करणारी कविता साधारणत: १९२० पासून मराठीत लिहिली जावू लागली तरी तिला खरा बहर आला तो स्वातंत्र्यानंतरच्या काळातच. कारण

स्वातंत्र्यानंतर काळात नव्याने लिहू लागलेल्या पिढीला एक नवे भान आले आणि ती स्वत:कडे निरखून पाहू लागली. भोवतीच्या खेड्याकडे बारकाईने पाहू लागली. ग्रामीण जीवनानुभव प्रकट करणाऱ्या कवींना ग्रामीण जीवन आकर्षित करु लागले. या ग्रामीण जाणीवांचे प्रकटीकरण मराठी कवितेत होऊ लागले. परिणामत: निसर्ग कवितेपेक्षा वेगळी अशी ग्रामीण जीवनाशी संबंध असलेली कविता आकाराला येवू लागली. जरी ग्रामीण कविता मोठ्या प्रमाणात लिहिली जात असली तरी समीक्षकांनी तिच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसते. स्वातंत्र्यपूर्वकाळात ग. ल. ठोकळांनी 'सुगी' हा जानपद कवितांचा संग्रह संपादित केला होता. इतर कवितांच्या काव्यातही ग्रामीण जीवन जाणीवपूर्वक आले होते. तसेच शांता शेळके यांच्या कवितेत खेड्यातील जीवन गतदिवसांच्या आठवणींच्या रुपाने येते. तसेच करंदीकरांच्या 'धोंड्या न्हावी' ही कविता ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविते. आनंद यादव, ना. धों. महानोर, विठ्ठल वाघ, शंकर बडे, राजा मुकूंद यांच्या कवितेत ग्रामीण जीवनासंबंधी जाणीव प्रकर्षाने दिसते.

'स्वातंत्र्योत्तर इतर गद्य साहित्याप्रमाणे ग्रामीण कवितेनेही ग्राम जीवनातील वास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण जीवन जगलेल्या, भोगलेल्या कवींच्या अनुभूतींनी घेतलेले सहज शब्दरुप असे स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण कवितेचे स्पष्ट रुप आहे. १९६० च्या दशकात आनंद यादव (हिरवे जग, मातीखालची माती), राजा महाजनी (डहाळी), सरोजनी बाबर (झोळणा), सदाशिव माळी (कुळमाळ) असे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. १९७५ नंतर ग्रामीण साहित्याच्या चळवळीबरोबर ग्रामीण कविताही मोठ्या प्रमाणात लिहिली जावू लागली. मोहन पाटील, आबा गणपती, फ. मु. शहाजिंदे आदी कवी नव्या जाणिवेने ग्रामीण काव्यलेखनाकडे वळले. तर नारायण सुमंत, वाहरु सोनवणे, इंद्रजित भालेराव यांना ग्रामीण साहित्य चळवळीने लेखनाचे बळ दिले.'[८]

याच वेळी मंगेश पाडगावकर, वसंत बापट, बा. भ. बोरकर, इंदिरा संत यांचीही कविता थोड्याफार प्रमाणात निर्माण होत होती. सौंदर्यवादापेक्षा वास्तववादी प्रवाहाला विद्रोही दलित जाणिवाचा प्रवाह येवून मिळाला.

## दलित कविता :

नारायण सुर्वे (माझे विद्यापीठ, जाहिरनामा), नामदेव ढसाळ, दया पवार, प्रल्हाद चेंदवणकर, वामन निंबाळकर यांनी विद्रोही कविता मोठ्या प्रमाणात लिहली. विद्रोही जाणिवेचा

पहिला स्फोट अत्यंत जोरकस शब्दात नामदेव ढसाळ यांच्या कवितेत अत्यंत समर्थपणे प्रकट झाला. ढसाळ (गोलपिठा), केशव मेश्राम (उत्खनन), यशवंत मनोहर (उत्थानगुंफा), दया पवार (कोंडवाडा) अर्जुन डांगळे (छावणी हालती आहे) इत्यादी कवींनी दलित विद्रोही कविता मोठ्या प्रमाणात लिहिली आहे. दलित कवितेतून व्यक्त होणारा विद्रोह परंपरागत समाज व्यवस्थेशी, माणसाचे माणूसपण नाकरणाऱ्या संस्कृतीशी आहे.

अशा प्रकारे विद्रोही जाणिवेतून काव्यलेखन करणाऱ्या कवींमध्ये सध्या तुलसी परब, पार्थ पोळके व काही नवोदित कवी काव्यलेखन करीत आहेत.

## विज्ञान कविता :

'सध्याच्या कालखंडाचा विचार करता मराठीमध्ये विज्ञान कविता ही नवी संकल्पना रुढ होताना दिसत आहे. सुरेश कदम (काळा सूर्य), दीपक शेळके (स्पर्श) शामकांत कुलकर्णी (कॉम्प्युटर) इत्यादी कविंनी 'विज्ञान कविता' हा नवा प्रवाह मराठी काव्यात आणला आहे.'[१०]

## अनियतकालीकामधील कविता :

साठोत्तरी मराठी कवितेच्या कालखंडाच्या आगे मागे पण याच कालखंडात वाड:मयीन परंपरेच्या विरोधात एक चळवळ उभी राहिली ती म्हणजे लघुअनियतकालीकांची चळवळ. साधारणत: १९५५ पासून सुरु झालेली ही चळवळ १९७४ पर्यंत अव्याहत पणे चालू होती. या लघुअनियतकालिकामधून कवी, लेखकांची एक नवी पिढी उदयाला आली यात यत्कींचीतही शंका नाही. या पिढीतील लेखक, कवींचे महत्वाचे कार्य कोणते असेल तर ते भाषीक कार्य होय. या चळवळीमागे कुठली अन्वेषण दृष्टी नाही. म्हणजे जीवनाचे विश्लेषण करण्याची चिंतनशाली नाही. बंडखोर किंवा विद्रोह हा केवळ वाङ्मयीन पातळीवरचा असू शकत नाही. तो मुलत: जीवनाच्या पातळीवरचा असला पाहिजे. तसेच आपले प्रश्न सोडविण्यासाठी आपल्या परंपरांची नीट जाणीव आपल्याला असली पाहिजे या सगळ्या गोष्टी अनियतकालीकांच्या चळवळी थंडवण्यामागे होत्या.

या काळामध्ये आरती प्रभु (दिवेलागण, नक्षत्रांचे देणे), कवी ग्रेस (संध्याकाळच्या कविता, चंद्रमाधवीचे प्रदेश) यांनी काव्यलेखन केले आणि मराठी काव्यक्षेत्रात एक जीवंतपणा ठेवला.

## आजची मराठी कविता - स्वरुप :

'आजची मराठी कविता पूर्णपणे छंदोमुक्त आहे. रचनेत मात्र कमालीची विविधता, वेगळेपणा आहे. कारण आजची बहुतांशी काव्यरचना ही नाटकातील स्वगतासारखी झाली आहे. प्रत्येक कवी एखाद्या व्यक्तीने स्व:शी किंवा कुणाला तरी उद्देशून आपले मनोगत खळखळून मोकळे होत बोलावा तसा कविता लिहतो. त्यामुळे कविता बोलण्याच्या खूप जवळ आली आहे. असा अभिप्राय शिरिष पै नोंदवितात.'[११]

व्यक्तिच्या नेहमीच्या बोलण्यातील प्रवाहित्व, बोलण्यातले भावनेचे उन्मत होणे, कुणाचाही विधिनिषेध न बाळगता उघडउघड बोलून टाकणे असे आजच्या कवितेच्या अभिव्यक्तीचे स्वरुप आहे. तरीही प्रतिकांच्या, प्रतिमांच्या क्वचित रुपकउपमांच्या वापरामुळे तसेच शब्दसौंदर्य आणि नादमाधुर्य ह्यांच्या ओढीमुळे बोलणे लयबध्द असावे ह्या इच्छेमुळे कधी कधी छंदमुक्त कविताही छंदोबध्द काव्यरचनेचे काही नियम निश्चितपणे सांभाळते. आपले काव्याच्या माध्यमातून बोलणे कुठे सुरु करावे आणि कुठे संपवावे ह्याचे उत्तम ज्ञान आणि जाण आजच्या कवितेला असल्याचे जाणवते.

आजच्या कवितेचे विषय अतिशय वैविध्यपूर्ण आहेत. आजच्या कवितेच्या सामाजिक आणि राजकिय जाणीवा फार जागृत आहेत. यातील उणीवांबद्दल, दोषांबद्दल ती आपल्या प्रतिक्रिया तीव्रपणे व्यक्त करते. प्रत्येक कवी आपल्या कवितेमध्ये आत्मशोध घेताना दिसतोय तसेच समाज आणि व्यक्ती यांच्या आत्मिक समस्यांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न आजची कविता करते. हे लेखण कवीला फार महत्वाचे वाटते.

'आजची कविता ही अभिव्यक्तीत अधिकाधिक मुक्त शब्दांना आणि भाषेला हवे तसे वाकवू पाहणारी झाली आहे. आजची कविता ही ओळीमागून ओळी वाचल्या, शब्दनंशब्द समजून घेण्याचा प्रयत्न केला तरी कुठे काहीच हाती गवसत नाही. एक आक्रस्ताळेपणा, वैताग आणि अर्वाच शब्दांची उधळमाधळ एवढेच पुन: पुन्हा जाणवते असा अभिप्राय ग. दि. माडगुळकरांनी यवतमाळ साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरुन बोलताना व्यक्त केला आहे.'[१२]

आजच्या कवितेची स्वगतांची शैली कवितेतल्या आशयाच्या प्रकटीकरणाच्या दृष्टीने सर्वस्वी अनुरुप अशीच आहे. आजच्या बहुतांश कवी-कवयित्री कुणाच्या अनुकरणात अडकत नाही. जो तो ज्याचा त्याचा स्वतंत्र विचार करतो आणि स्वत:च्या विचारांचा, स्वत:चा ठसा कवितेवर

उमटावा अशा पद्धतीने तीला आकार देऊ पाहतो. किंबहुन आतील वैचारीक संघर्षाला प्रकट करण्यासाठीच बहुतेक कवींची कविता लिहली जात आहे. त्यामुळे 'आजच्या काव्यात तालही नाही आणि तोलही नाही. दमही नाही आणि म्हिदमही नाही वृत्त निवृत्त झाले आहेत'' असे सोपानदेव चौधरी म्हणतात.''[१३]

## समारोप :

वरील मराठी कवितेच्या स्वरुप वाटचालीतील विविध प्रवृत्ती प्रवाहांचा ऐतिहासीकतेने विचार करता आपल्या असे लक्षात येते की, आधुनिक मराठी काव्यात विलक्षण बदल झाले.

एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील वास्तववादी संप्रदाय, उत्तरार्धात पाश्चात कवी वर्डस्वर्थ, टेनीसन, बायरन, शेले, कीट्स यांचा रोमँटिक संप्रदाय आणि दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातील अतिवास्तववादी संप्रदाय यांचे परिणाम मराठी कवितेवर झाले. या संप्रदायाची लक्षणे मराठी काव्यात दिसून येतात. उदाहरणार्थ रोमँटिक सांप्रदायाचा परिणाम केशवसुतकालीन कवींनी लिहलेल्या भावगीत, प्रेमगीतांवर झाला. रविकिरण मंडळ व त्यानंतरच्या कवींच्या काव्यात वास्तववाद प्रकर्षाने दिसतो. तर मर्ढेकरप्रभृती नवकवींच्या काव्यात यंत्रयुगाने मानवाच्या जीवनावर केलेला परिणाम, त्यातून मानवाला झालेली 'स्व' ची जाणीव आपल्या लक्षात येते. या सर्व छोट्या मोठ्या घटकांचा सांस्कृतिक, राजकिय संक्रमणाचा परिणाम आधुनिक मराठी कवितेवर झाला आहे.

अशा प्रकारे मराठी काव्याचा प्रवाह अतिशय विस्तृत आहे. या प्रवाहात विविध प्रकारची कविता निर्माण झाली. काही कवींना वैभवाचे दिवस उपभोगायला मिळाले तर काही कवी व त्यांच्या कविता वाचकांसमोर आल्या नाहीत.

एकंदर मोठ्या प्रमाणात निर्माण झालेली कविता ईश्वरभक्तीपासून आत्मनिष्ठेकडे प्रवास करताना दिसते. सामाजिक, निसर्गवादी, प्रेमकविता, दलित-विद्रोह प्रकट करणारी कविता निर्माण झाली या काव्यप्रवाहांनी मराठी काव्याचे क्षेत्र व्यापक बनविले.

## संदर्भग्रंथ :


१) साहित्यविमर्श : डॉ. सौ. विद्या व्यवहारे : चिन्मय प्रकाशन औरंगाबाद - २००३

(पृष्ठ १०७ ते १८८सारांश)

२) प्राचीन मराठी संत कवयित्रींचे योगदान : डॉ. सुहासिनी इर्लेकर : परिमल प्रकाशन औरंगाबाद - १९८० (पृष्ठ १२६)

३) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास : अ. मा. देशपांडे : व्हीनस प्रकाशन पुणे - १९५८ : दुसरी आवृत्ती मुंबई १९५१ (पृष्ठ ३८३)

४) अर्वाचीन मराठी काव्य : रा. श्री. जोग : दुसरी आवृत्ती मुंबई १९५१

(पृष्ठ - २९४)

५) टीकास्वयंवर : भालचंद्र नेमाडे : ललित प्रकाशन औरंगाबाद :

(पृष्ठ - ९५ ते ९९)

६) मराठी कविता काही वळणे : देशपांडे केजकर प्रकाशन : साकेत प्रकाशन औरंगाबाद : १९७४

(पृष्ठ - ४६)

७) तत्रैव : (पृष्ठ - ४९)

८) १९७५ नंतरची मराठी कविता प्रवाह आणि प्रतिक्रया : डॉ. रवींद्र ठाकूर : स्वरुप प्रकाशन औरंगाबाद : १९९९ (पृष्ठ - ९१)

९) तत्रैव : (पृष्ठ - ९२)

१०) तत्रैव : (पृष्ठ - १४७)

११) ललित : मुंबई : १९९२ : अंक सातवा (पृष्ठ - ४७,५५)

१२) टीका स्वयंवर : भालचंद्र नेमाडे : साकेत प्रकाशन औरंगाबाद : १९९०

(पृष्ठ - ४४)

१३) तत्रैव : (पृष्ठ - ४६)